

# अध्यक्षांचे मनोगत

सन्मानीय सभासद बंधु-भगिनीनो,

आपणां सर्वांचे आराध्यदैवत व आपल्या **दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँकेचे संस्थापक**, संतश्रेष्ठ गाडगे बाबांचे शिष्य **निष्काम कर्मयोगी ह.भ.प. वै. दत्तात्रय महाराज कळंबे,** बँकेचे सातत्यपुर्ण मार्गदर्शक राहिलेले सातारा जिल्ह्याचे जेष्ठ नेते, थोर स्वातंत्र्य सेनानी **स्व. भिलारे गुरुजी (दादा)**, महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार **स्व. यशवंतराव चव्हाण,** माथाडी कामगारांचे दैवत **स्व. अण्णासाहेब पाटील,** यांच्या स्मृतींना अभिवादन करून बँकेच्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थितीत असलेल्या सर्व सभासद बंधु भगिनींचे बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने मी सर्वप्रथम हार्दिक स्वागत करतो.

आपल्या बँकेच्या सर्वांगीन विकासाकरीता सातत्यपुर्ण मार्गदर्शन लाभत असलेले जावली तालुक्याचे सुपत्र व **महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथजी शिंदे,महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री मा.ना. श्रीमंत छ. शिवेंद्रराजे भोसले-आमदार जावली सातारा, महाराष्ट्र राज्याचे पुनर्वसन व मदतकार्य मंत्री मा. ना. श्री. मकरंद पाटील (आबा)- आमदार वाई- महाबळेश्वर-खंडाळा, मा. श्रीमंत छ. उदयनराजे भोसले, खासदार-सातारा, मा. खा. श्री. आनंदरावजी अडसुळ - अध्यक्ष महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोग व अध्यक्ष को-ऑप. बँक एम्प्लॉईज युनियन, माजी केंद्रीय अर्थराज्य मंत्री, मा. खासदार श्री. नितिन पाटील, मा.श्री. शशिकांतजी शिंदे- माजी जलसंपदा मंत्री तसेच आमदार विधान परिषद, मा.श्री नरेंद्र पाटील-सरचिटणीस, माथाडी कामगार युनियन, मा. श्री सदाशिवभाऊ सपकाळ- माजी आमदार जावली व बँकेचे मार्गदर्शक श्री वसंतराव मानकुमरे (भाऊ) माजी उपाध्यक्ष-जिल्हा परिषद सातारा, माजी संचालक-जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सातारा, मा.श्री.राजेंद्रशेठ राजापुरे - माजी उपाध्यक्ष व विद्यमान संचालक सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, सातारा, मा.अमितदादा कदम - माजी सभापती अर्थ व शिक्षण समिती, जिल्हा परिषद, सातारा ,** सहकार क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या विविध आर्थिक संस्था व त्यांचे सर्व पदाधिकारी, कामगार संघटना, क्रिडा, शैक्षणिक व सामाजिक संस्था, बँकेबद्दल आत्मीयता असलेले बँकेचे असंख्य खातेदार, ठेवीदार, कर्जदार, सभासद, हितचिंतक व मान्यवरांनी अहवाल वर्षामध्ये बँकेप्रती दाखविलेला विश्वास आणि केलेले अमुल्य मार्गदर्शनामुळे बँकेच्या आर्थिक स्थितीत अहवाल वर्षात गुणात्मक वाढ झाल्याचे नमुद करतो.

**जागतिक व देशांतर्गत आर्थिक स्थितीचा आढावाः**

सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात जगभरात मोठ्या प्रमाणात निवडणुका होऊन जगातील एकूण लोकसंखेच्या तुलनेने निम्म्यापेक्षा कमी लोकांनी विविध देशांत मतदान केले. त्याच बरोबर रशिया युक्रेन व इस्त्रायल हमास यांच्यामधील युध्दजन्य संघर्षामुळे जागतीक अर्थव्यवस्थेवर प्रतिकुल परिणाम झाला. यामुळे उर्जा आणी अन्न सुरक्षेवर परिणाम होऊन आवश्यक वस्तूंच्या किंमती वाढल्या आणि महागाईत वाढ झाली. व्यापारी धोरणातील अनिश्चितिमुळे जागतिक वित्तीय बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात चढ उतार झाले. त्याचाच परिणाम अमेरीकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रूपयाच्या विनिमय दरावर झाला. आर्थिक सन २०२४-२०२५ दरम्यान डॉलरचा उचांकी विनिमय दर रू.८७.९७ व निचांकी रुपये ८२.९५ होता. म्हणजेच एकूण ५.२ चा चढ-उतार नोंदविला गेला. भारत सरकारने पायभूत सोई सुविधाकरिता केलेली गुंतवणूक पाहाता व सन २०२४-२०२५ जागतीक व्यापार आणि धोरणात्मक अनिश्चिततेचा परिणाम लक्षात घेता रिझर्व्ह बँकेने पुढील आर्थिक वर्षाकरीता देशाचा आर्थिक विकासाचा दर ६.५% इतका अपेक्षित केलेला आहे.

रिझर्व्ह बँकेने सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात पहिल्या तीन तिमाहित व्याजदरात कोणतीही कपात केलेली नाही. मात्र ऑक्टोंबर २०२४ मध्ये आपले धोरण Withdrawal of Accommodation वरून Neutral असे केले फेब्रुवारी २०२५ मध्ये रिझर्व्ह बँकेने रेपो दर ०.२५ पॉईंट बेसीसने कमी करुन ६.२५ इतका केला. सदरची कपात फेब्रुवारी २०२३ नंतरची पहिली कपात होती. तद्नंतर रिझर्व्ह बँकेने बाजारात पर्याप्त तरलता (Liquidity) पुर्ततेसाठी दिनांक १४.१२.२०२४ रोजी व दिनांक २८.१२.२०२४ रोजी अनुक्रमे Cash Reserve Ratio (CRR) ०.२५ पॉईंट बेसीसने कमी केला व भविष्यात जुन महिन्यातील MPC बैठकीत पुन्हा ०.२५ बेसीस पॉईंटने कमी करण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम बँकेच्या ठेवी व कर्जावरील व्याजदरावर होऊन नफा क्षमतेवर होण्याची शक्यता आहे.

**आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील बँकेच्या आर्थिक स्थितीचा आढावाः**

**निष्काम कर्मयोगी संत वैकुंठवासी ह.भ.प. दत्तात्रय महाराज कळंबे** यांनी आध्यात्मिक विचारधारा जोपासत गोरगरीब, कष्टकरी, वंचित व माथाडी कामगारांचे आर्थिक जीवनमान सुधारणे करीता १९७३ साली बँकेची स्थापना केली. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक निर्देश (RBI Directives/Guidelines) व बदलती आर्थिक धोरणे यांस अधिन राहून बँकेने वेळोवेळी व्यवसायाचे नियमन केलेले आहे. रिझर्व्ह बँकेच्या व्यवसायिक अनुशासन (Corporate Governance) या मार्गदर्शक तत्वास अधिन राहून बँकेने कामकाजात सभासदांचे व ठेवीदारांचे हित जपून पारदर्शकता (Transparency) निर्माण केलेली आहे. अधिकारांचे जास्तीत जास्त विकेंद्रिकरण करून निर्णय प्रक्रियेमध्ये सुलभता व व्यावसायिकता निर्माण केलेली आहे. त्या करीता संचालक मंडळाच्या विविध समित्या, कार्यरत आहेत. बँकेने गतकालावधीतील असलेल्या आवाहनांचा सखोल अभ्यास करुन त्यावर मात करण्याकरिता विविध प्रकारची सुसंगत धोरणे (Policies) आखलेली आहेत. सदर धोरणांची मागील तीन वर्षात यशस्वी रित्या काटेकोरपणे अंमलबजावणी केल्याने मार्च २०२५ अखेर बँकेने, रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक दृष्ट्या सक्षम आणि योग्य व्यवस्थापन असलेल्या बँकेच्या (Financial Sound Well Management Bank) या मानांकनाची पुर्तता केलेली आहे. हे मी या ठिकाणी नम्रपणे नमुद करतो.

बँकेने मागील वर्षात कर्ज वसुली व नफा क्षमता वाढविण्यावरती विशेष उपाययोजना व प्रयत्न केले होते त्यामध्ये समस्त मा. संचालक मंडळ सदस्य, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य, सर्व श्रेणीतील अधिकारी व कर्मचारी यांचे बहुमुल्य योगदान आहे. बँकिंग उद्योगात जिथे विश्वास कार्यक्षमता आणि उत्कृष्ठ सेवा यावर यश अवलंबून असते तिथे कर्मचारी वर्ग हा बँक वाढीसाठीचा सर्वात मोठा आपला ठेवा (Asset) आहे. नवनवीन तंत्रज्ञान विकसित होऊ शकते. उत्पादने बदलू शकतात पण आपल्या कर्मचा-यांची जिद्द बांधीलकी आणी कौशल्य हा आपल्या व्यवसायाचा कणा आहे हे मी नम्रपणे नमुद करतो.

बँकेने ३१ मार्च, २०२५ रो[illegible] ीलप्रमाणे गुणात्मक [illegible] ative) [illegible] ली आहे;

(₹ in Crores)

| अ.क्र. | तपशील | ३१ मार्च, २०२५ अखेर | ३१ मार्च, २०२४ अखेर | ३१ मार्च, २०२३ अखेर |
|---|---|---|---|---|
| १ | स्वनिधी (Owned Fund) | 136.98 | 138.85 | 140.50 |
| २ | ठेवी (Deposits) | 873.64 | 851.49 | 791.59 |
| ३ | कर्जे (Advances) | 586.77 | 571.15 | 529.01 |
| ४ | एकुण संमीश्र व्यवसाय (Total Business Mix) | 1460.41 | 1422.64 | 1320.60 |
| ५ | गुंतवणूक (Investments) | 351.70 | 236.03 | 277.35 |
| ६ | खेळते भांडवल ( Working Capital) | 1075.56 | 1034.48 | 975.37 |
| ७ | निव्वळ नफा (Net Profit) | 10.24 | 8.61 | 1.10 |
| ८ | ढोबळ अनुत्पादीत कर्जाचे प्रमाण (% of Gross NPAs) | 5.29% | 6.62% | 9.83% |
| ९ | निव्वळ अनुत्पादीत कर्जाचे प्रमाण (% of Net NPAs) | 0.00% | 0.17% | 3. 29% |
| १० | नक्त संपत्ती मूल्य (Net Worth) | 70.75 | 62.40 | 53.55 |
| ११ | भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण ( % of CRAR) | 16.30 | 14.88% | 13.00% |
| १२ | Provision Coverage Ratio | 110.00 | 97.56 | 75.15 |
| १३ | **ऑडिट वर्ग (Audit Class)** | **"A"** | **"A"** | **"A"** |

बँकेच्या वरील लेखापरिक्षीत (Audited) आर्थिक व सांपत्तिक स्थिती सादर करताना आपली बँक भक्कम भांडवली पायावर सक्षम रीत्या उभी असून बँकेचे रू.१३६.९८ कोटी स्वनिधी व भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण (CRAR) १६.३०% हे प्रमाण त्याची निश्चिती करतात. बँकेने या आर्थिक वर्षात आवश्यक त्या तरतूदी करून रु१०.२४ कोटी इतका निव्वळ नफा कमविलेला आहे. माहे ३१ मार्च, २०२५ अखेर बँकेच्या ठेवींमध्ये रू.२२.०५ कोटी इतकी व कर्जामध्ये रू.१५.६२ कोटी इतकी वाढ होऊन ती अनुक्रमे रू.८७३.६४ कोटी व कर्जे रू.५८६.७७ कोटी इतकी झालेली आहेत. बँकेने गत वर्षात गुणात्मक (Qualitative) वाढीवर भर दिलेला होता. परंतू पुढील आर्थिक वर्षात बँकेने संख्यात्मक (Quantitative) वाढीचे धोरण स्वीकारून पुढील कालावधीत बँकेच्या ठेवी व कर्जामध्ये वाढ करण्याचे सर्वोतपरी प्रयत्न केले जातील बँकेचा २४ शाखांच्या माध्यमातून एकुण समिश्र व्यवसाय रू.१४६०.४१ कोटी इतका झालेला आहे.

बँकेने मागील तीन वर्षापासून सातत्याने अनुत्पादित कर्जाच्या वसुलीवर (NPA) विशेष लक्ष केंद्रित केले होते. त्याचाच परिणाम म्हणून बँकेचा मार्च २०२२ अखेर १४.६५% असणारा (Gross NPA) मार्च २०२५ अखेरीस ५.२९% इतका कमी करण्यात आपल्या बँकेला यश प्राप्त झालेले आहे. पुढील कालावधीत उर्वरीत अनुत्पादित (NPA) कर्ज वसुलीवर लक्ष केंद्रित करून बँकेचा ढोबळ एन पी ए चे प्रमाण (Gross NPA) ३.००% पेक्षा कमी राखणेकरीता प्रयत्न केले जातील. गत वर्षात बँकेचा निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ०.१७% (Net NPA) इतके होते, वसुलीच्या विशेष प्रयत्नामुळे त्यात लक्षणिय घट होऊन त्याचे प्रमाण ०.००% झालेले आहे. बँकेने कर्ज छाननी व मंजूर प्रक्रियेमध्ये व्यवसायिकता व पारदर्शकितचा समावेश करून सुरक्षीत कर्ज मंजूरी प्रक्रियेवर भर दिलेला असल्याने मागील तीन वर्षात मंजूर केलेल्या कर्ज प्रकरणापैकी, अनुत्पादित प्रवर्गात वर्ग होणा–या कर्जाचे प्रमाण अत्यंत अल्प अस राहिले आहे. बँकेचे संचालक मंडळ, सभासद, ठेवीदार व कर्मचारी वर्ग यांच्या अथक प्रयत्नातून बँकेची आर्थीक स्थिती सक्षम होण्यास मदत झाली आहे. त्याचाच सकारात्मक परिणाम म्हणून बँकेस या अहवाल वर्षातही ऑडीटचा '**अ वर्ग**' प्राप्त झालेला आहे. याचा मला विशेष आनंद होत आहे

**बँकिंग व्यवसाय आणि भारतिय रिजर्व्ह बँकेद्वारे करण्यात येणारे नियंत्रण:**

भारतीय रिझर्व्ह बँकेमार्फत करण्यात येणा–या नियंत्रण व पर्यवेक्षण पद्धतीत अमुलाग्र बदल केलेला आहेत. बँकीग नियमन कायदा–१९४९ (Banking Regulation Act 1949) मध्ये केलेल्या सुधारणामुळे नागरी सहकारी बँकावरील दुहेरी नियंत्रण पध्दत संपुष्टात आलेली आहे. नागरी सहकारी बँकामध्ये व्यवसायिक अनुशासन (Corporate Governance), जोखिम व्यवस्थापन (Risk Management), अनुपालन (Compliance), माहिती व तंत्रज्ञान व सायबर सुरक्षेची सज्जता (IT Infrastructure Cyber Security) आणि मानव संसाधन (Human Resources Development) विभागाचे महत्त्व अधोरेखित झालेले आहे. बँकींग व्यवसायामध्ये विविध प्रकारच्या जोखीमांचा सामना करावा लागतो त्यामध्ये प्रामुख्याने कर्ज जोखीम (Credit Risk), बाजार जोखीम (Market Risk), तरलता जोखीम (Liquidity Risk), माहिती व तंत्रज्ञान व फसवणुक जोखीम (IT Froud Risk) बँकेमार्फत या विविध जोखिमांचे ओळख (Identification) मोजणी (Measurement) निरिक्षण (Monitoring) व नियंत्रण सुनिश्चित (Mitigation) केले जाते.

रिझर्व्ह बँकेने दिनांक १३.०३.२०२० रोजीच्या परिपत्राकानुसार आपल्या नागरी सहकारी बँकेस एकुण कर्ज वाटपामध्ये रू. २५.०० लाखापेक्षा लहान कर्जाचे (Small Value Loan) प्रमाण ५० % पर्यंत वाढविण्याचे निर्देश दिले होते. सध्य स्थितीत आपल्या बँकेचे प्रमाण ३४.५०% आहे. सदरचे उद्दीष्टे साध्य करण्याकरीता ३१. मार्च. २०२६ पर्यंतची मुदत रिझर्व्ह बँकेने दिलेली आहे. त्याकरीता पुढील कालावधीत २५ लाखापेक्षा कमी रकमेच्या कर्जवाटपावर बँकेचा प्रामुख्याने भर राहिल. रिझर्व्ह बँकेने Risk based Internal Audit (RBIA) यास महत्व दिलेले असुन त्या अनुषंगाने सर्व शाखांचे बँकेच्या ऑडीट विभागामार्फत Risk Based Internal Audit (RBIA) केले जाते दिनांक ०१ एप्रिल २०२५ पासून नागरी सहकारी बँकाचे नियंत्रण करण्याकरीता Prompt Corrective Action (PCA) हि संकल्पना लागू केलेली आहे. बँकेची आगामी वाटचाल भारतीय रिझर्व्ह बँकेचे मार्गदर्शक निर्देश यास अधिन राहून बँकिंग व्यवसायातील विविध स्वरुपातील जोखीम व धोके यांचे सुनिश्चित व्यवस्थापन करण्यावर राहिल.

**माहिती तंत्रज्ञान सेवा व सायबर सुरक्षा:**

**बँकिंग सेवा व डिजिटल पायाभूत सुविधा एक प्रगतीशील वाटचाल**

आपण सध्या जलद गतीने बदलणाऱ्या डिजिटल परिवर्तनाच्या युगात कार्यरत आहोत. तंत्रज्ञानातील नवकल्पनांमुळे ग्राहकांच्या अपेक्षा सातत्याने वाढत असताना, आपली बँक ग्राहकांसाठी सुलभता वाढवणारी आणि माहितीची सुरक्षितता अबाधित ठेवणारी नाविन्यपूर्ण सेवा अंगीकारण्यास सदैव कटिबद्ध आहे. सहकारी बँकिंगचे भविष्य हे जबाबदारीने तंत्रज्ञान वापरण्यात असून, ग्राहक–केंद्रितता आणि कार्यक्षमतेवर ठाम भर देणे आवश्यक आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence ) या तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव लक्षात घेता, भविष्यात ग्राहक सेवा वैयक्तिकरण, फसवणुक शोध प्रणाली, वर्कफ्लो ऑटोमेशन आदी बाबतीत AI-आधारित उपायांचा समावेश करण्याची आमची योजना आहे. हे उपाय स्मार्ट निर्णयक्षमतेला चालना देतील व ग्राहकांच्या गरजा अधिक चपखलपणे पूर्ण करतील.

आपल्या डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, १७ शाखांमध्ये ऑनसाईट एटीएम सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या एटीएमद्वारे ग्राहकांना एटीएम रोख पैसे काढणे, RTGS, NEFT, UPI, E-Comm, PoS, IMPS व मोबाईल बँकिंग सेवा रुपे डेबिट कार्डच्या माध्यमातून मिळतात.

पॅराबँकिंग सेवा विभागाअंतर्गत. आमची बँक जीवन विमा, सर्वसाधारण विमा, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY) व PAN कार्ड सुविधा अशा आर्थिक समावेशकतेच्या दृष्टीने अत्यावश्यक सेवा एकाच छताखाली देत आहे.भविष्यात ई–वॉलेट सुविधा, ॲटो पे सेवा, स्वयंसेवा किऑक्स, ऑनलाईन डिजीटल ग्राहक ऑनबोर्ड (eKYC) इ. सुविधा सुरू करण्यात येतील.

**सायबर सुरक्षा उपाय**

ग्राहकांचा डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी व डिजिटल बँकिंग सेवा विश्वसनीय राहावी यासाठी एंटरप्राइज–ग्रेड फायरवॉल्स, एंडपॉइंट सुरक्षा उपाययोजना. डेटा एनक्रिप्शन प्रोटोकॉल्स, सिक्युरिटी ऑपरेशन सेंटर (SOC) हे सायबर सुरक्षा उपाय अंतर्गत केलेले आहेत. नियमित सिस्टिम वल्नरेबिलिटी तपासण्या (VAPT) IT ऑडीट हे आमच्या बँकेच्या सुरक्षित डिजिटल बँकिंग व्यवस्थेचा कणा आहेत.

**बँकेची भविष्यातील धोरणे व वाटचालः**

बँकेच्या कामकाजात भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशास अधिन राहून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे अनिर्वाय झालेले आहे. त्या अनुषंगाने पुढील कालावधीत बँकेचे आय टी ईन्फ्रास्ट्रक्चर व कोअर बँकिंग कार्यप्रणालीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बँकेचे सभासद ठेवीदार, ग्राहक इत्यादिंना सुरक्षित तंत्रज्ञानस्नेही सेवा सुविधा देण्याच्या सज्जतेवर भर दिला जाईल. बँकेच्या कामकाजामध्ये व्यवसायिक दृष्टीकोन अंगीकारून दिर्घ कालीन आर्थिक स्थैर्याच्यादृष्टीने बँकेच्या स्वनिधीत ( Own Funds) जास्तीत जास्त वाढ करुन बँकेचे नक्त मुल्य (Net Worth) १०० कोटी करण्याचे उदिष्ट निश्चित करण्यात आले आहे. भविष्यात भावनेच्या आहारी जाऊन निर्णय न घेता बँकेच्या हितास प्राधान्य (Interest of the Bank) देऊन दुरगामी धोरनात्मक निर्णय घेण्यात येतील. त्यामध्ये प्रामुख्याने नवीन शाखांना परवानगी, तोट्यात असलेल्या शाखांचे स्थलांतर, सभासद, ठेवीदार व ग्राहक यांचे आवश्यकतेनुसार शाखांच्या कार्यालयीन वेळेत बदल व कर्मचाऱ्यांना सातत्यापुर्ण प्रशिक्षण दिले जाईल. बँकेचा नफाक्षमता वाढविणेकरीता बँकेचे CASA Deposit चे प्रमाण एकुण ठेवीच्या ४०% इतके राखण्यावर व Non Interest Income वाढविण्यावर विशेष भर दिला जाईल त्याकरीता विमा व्यवसायाबरोबरच ग्राहकांना इतर सेवा सुविधा देण्याचा प्रयत्न केला जाईल. बँकेने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक दृष्ट्या सक्षम व योग्य व्यवस्थापन ($FSWM^2$) असलेल्या नागरी सहकारी बँकाबाबतच्या सक्षमतेची सर्व मानांकन पुर्ण केल्याने पुढील कालावधीत बँकेच्या कामकाजात व्यवसायिक अनुशासन (Corporate Governance), जोखिम व्यवस्थापन, (Risk Management), अनुपालन (Compliance), माहिती व तंत्रज्ञान व सायबर सुरक्षेची सज्जता (IT Infrastructure Cyber Security) आणि मानव संसाधन (Human Resources Development) इत्यादी बाबींचा व्यवसायीक दृष्ट्या अंतर्भाव करून बँकेस शेड्युल्ड दर्जा प्राप्तीचे धोरण निश्चीत करुन त्याची अंमलबजावणी केली जाई. आपणां सर्वांचे आपल्या बँकेवर निरंतर प्रेम आणि जिव्हाळा आहेच, तो याही पुढे वृद्धींगत होत राहील याची मला पुर्ण खात्री आहे. आगामी कालवधीत आपल्या बँकेच्या माध्यमातुन सर्व सामान्यांचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास त्याचप्रमाणे बँकेने आखलेली विकासाची ध्येय्य–धोरणे पुर्णत्वास नेण्याकरीता आपणां सर्वाच्या सहकार्याची अपेक्षा करतो.

जय हिंद, जय सहकार

आपला स्नेहांकित
**श्री विक्रम विजयकुमार भिलारे**

## ◈ प्रशासन ◈

**श्री.ईश्वरदास दयाराम लालवाणी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**श्री.गोविंद कृष्णा जाधव**
सरव्यवस्थापक

## ◈ उपसरव्यवस्थापक ◈

**श्री.नामदेव शंकर बांदल**
(दि. ३०/०४/२०२५ पर्यंत)

**श्री.अनिल गुलाबराव सणस**

## ◈ सहाय्यक सरव्यस्थापक ◈

**श्री.संजय साहेबराव सकपाळ**

**श्री.सुधाकर यशवंत दळवी**

**श्री.संतोष श्रीकांत वैद्य**

---

## ◈ वैधानिक लेखापरिक्षक ◈
## जैन त्रिपाठी ॲण्ड कंपनी (चार्टड अकौंटंट)

---

## ◈ टॅक्स ऑडिटर्स ◈

**मे विंदु ॲन्ड असोसिएट्स**
चार्टर्ड अकौंटंट

## ◈ जी एस टी ऑडिटर्स ◈

**मे पायल गाडा ॲण्ड असोसिएटस्**
चार्टर्ड अकौंटंट

## ◈ समावर्ती लेखापरिक्षक ◈

**मे दिनेश आहिर ॲन्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट

**मे केसरी ॲन्ड असोसिएट्स**
चार्टर्ड अकौंटंट

**मे हितेश प्रशांत ॲन्ड असोसिएट्स**
चार्टर्ड अकौंटंट

मे डी जी ठकरार अँड असोसिएट्स
चार्टर्ड अकौंटंट

**मे नितीन दळवी ॲन्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट

**मे रूपेश सावले ॲन्ड असोसिएट्स**
चार्टर्ड अकौंटंट

**मे विंदू ॲन्ड असोसिएट्स**
चार्टर्ड अकौंटंट

**मे पायल गाडा ॲण्ड असोसिएटस्**
चार्टर्ड अकौंटंट

**मे विवेक शहा ॲन्ड असोसिएट्स**
चार्टर्ड अकौंटंट

**मे मयुरेश बनकर ॲन्ड असोसिएट्स**
चार्टर्ड अकौंटंट

**मे अभिजीत शिंदे ॲन्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट

मे ए एस देव अँड कंपनी
चार्टर्ड अकौंटंट

## ◈ स्टॉक ऑडीटर्स ◈

मे सपना एस जैन अँड कंपनी
चार्टर्ड अकौंटंट

**मे एम.के.टी.एस.के. ॲन्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट

**मे विंदू ॲन्ड असोसिएट्स**
चार्टर्ड अकौंटंट

मे पी आर मोहिते अँड कंपनी
चार्टर्ड अकौंटंट

## ◈ आय.एस. ऑडीटर्स ◈

मे टेकवोल इन्फोसेक प्रा.ली.
चार्टर्ड अकौंटंट

**मे फिनिक्स टेक्नोसायबर प्रा.लि.**
चार्टर्ड अकौंटंट

## बँकर्स

| | | | |
|---|---|---|---|
| रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. | मुंबई जिल्हा मध्य सह बँक लि., | सातारा जिल्हा मध्य.सह.बँक लि. |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | एच डी एफ सी बँक लि. | आय डी बी आय बँक | आय सी आय सी आय बँक लि., |
| बँक ऑफ इंडिया | बँक ऑफ बडोदा | येस बँक लि. | युनिटी स्माल फायनान्स बँक लि. |

## कॉर्पोरेट एजन्सीज

**विमा व्यवसाय :** आय सी आय सी आय लोंबार्ड इन्शुरंन्स कं.लि., कोटक महिंद्रा लाईफ इन्शुरंन्स कं.लि.,युनिव्हर्सल सोम्फो जनरल इन्शुरंन्स कंपनी, रिलायन्स जनरल इन्शुरंन्स कंपनी, आदित्य बिर्ला सनलाईफ इन्शुरंस कं.लि., चॉईस ब्रोकर.

**पॅनकार्ड :** यु टी आय इन्फ्रास्ट्रक्चर ॲन्ड सर्व्हीसेस लि., (UTIITSL)

**DMK JAOLI BANK**
**दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक लि.**
(नोंदणी क्रं. बी. ओ. एम./बी.एन.के./ १२७ ऑफ १९७३)
**प्रशासकीय कार्यालय :** ४१८/२०/२२, मौलाना आझाद रोड, मुंबई.- ४०० ००४. दुरध्वनी क्र.: +९१ २२-२३८६३५२
Website : www.jaolibank.in Email : hoadmin@jaolibank.in, hoscr@jaolibank.in

# ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरीता )**

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येतेकी, बँकेची ५२वी वार्षिक सर्वसाधारण सभा, **रविवार दिनांक २२.०६.२०२५ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता डॉ. अँटोनिओ डी-सिल्व्हा हायस्कुल, एस के बोले रोड, कबुतरखान्याजवळ, दादर (प), मुंबई-४०० ०२८** येथे आयोजीत करण्यात आलेली आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

## ❊ सभेपुढील विषय ❊

१. दिनांक २३ जून, २०२४ रोजी संपन्न झालेल्या ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे,
२. दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाचे वाचन करुन त्यास स्विकृती देणे,
३. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२४-२०२५ च्या करण्यात आलेल्या नफा-विभागणीस मान्यता देणे,
४. वैधानिक लेखा परिक्षकांचा सन २०२४-२०२५ चा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल व आर्थिक वर्ष २०२३-२०२४च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष-दुरुस्ती अहवालाची (Compliance Report) नोंद घेणे,
५. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे,
६. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पुर्व मान्यतेने आर्थिक वर्ष २०२५-२०२६ करीता करण्यात आलेल्या वैधानिक लेखा परीक्षकांचे नियुक्तीबाबत नोंद घेणे आणि त्यांना अदा करावयाचा मेहनतांना ठरविण्याचे अधिकार बँकेच्या संचालक मंडळ सभेस प्रदान करणे,
७. माहे ३१ मार्च, २०२५ अखेर बँकेचे संचालक सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना अदा करण्यात आलेल्या कर्जाची नोंद घेणे,
८. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात सभासदांचे प्रशिक्षणाकरीता राबविलेले कार्यक्रम व आगामी कालावधितील धोरण यांचा आढावा घेणे,
९. महाराष्ट्र सहकारी संस्थानियम १९६१ चे कलम ४९ अन्वये वैधानिक लेखापरिक्षकांनीप्रमाणीत केलेली संशयीत व बुडीत कर्जे येणे बाकी रक्कम संबंधीतकर्जदारांकडुन करावयाच्या वसुलीचे सर्व अधिकार अबाधीत ठेऊन निर्लेखन करण्यास मान्यता देणे,
१०. ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची गैरहजेरी क्षमापील करणे,
११. मा. अध्यक्षांचे परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

मुंबई
दिनांक: ०६.०६.२०२५

संचालक मंडळाचे संमतीने
**ईश्वरदास दयाराम लालवाणी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

## विशेष सुचना :

१. गणसंख्येपुर्ती अभावी सभा तहकुब करावी लागल्यास सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर म्हणजेच सकाळी ठीक १०.३० वाजता सुरु होईल व त्या सभेच्या कामकाजाच्या वेळी गणसंख्यापूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

२. वार्षीक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरळीत होण्यासाठी ज्या सभासदांना विधायक स्वरुपात काही प्रश्न, सुचना मांडावयाच्या असतील अथवा बँकेच्या कामकाजासंबंधी काही माहीती विचारावयाची असेल त्यांनी दि.१३.०६.२०२५ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालय– ४१८/२०/२२, मौलाना आझाद मार्ग, मुंबई–४०० ००४ या ठिकाणी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीनवेळेत तपशीलवार लेखी स्वरुपात अथवा hoscr@jaolibank.in या ई–मेलवर आयडी वर पाठविल्यास त्याप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभेत माहिती, खुलासा सादर करणे सोयीचे होईल,

३. भारतीय रिझर्व बँकेच्या सूचनेनुसार सर्व सभासदांनी/ खातेदारांनी के. वाय.सी. (K.Y.C.) बाबतच्या कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे. ज्या सभासदांच्या पत्त्यात बदल झाला आहे. किंवा वारसाची नोंद केलेली नाही त्यांनी या बाबींची त्वरीत पुर्तता करुन घ्यावी, त्याकरीता आपल्या शाखेत संपर्क करावा,

४. बँकेचा सन २०२४–२०२५चा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा–तोटा पत्रक बँकेच्या वेबसाईट www.jaolibank.in वर प्रसिध्द करण्यात आलेला असुन प्रत बँकेच्या सर्व शाखांत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

## बँकेचे संचालक
## कै.अरुण बाबुराव सुर्वे

(मृत्यू दि. 03/05/2025)



भावपूर्ण श्रध्दांजली

# संचालक मंडळाचा अहवाल

**समाननीय सभासद बंधू भगिनींनो,**

आपल्या बँकेने वेळोवेळी विकसीत होत जाणारे तंत्रज्ञान, ग्राहकाभिमुखता, सामाजिक बांधिलकी यांना सर्वोच्च प्राधान्य देत अहवाल वर्षात व्यवसायामध्ये समाधानकारक प्रगती साधलेली असल्याने बँकेचा ३१ मार्च २०२५ अखेरचा ताळेबंद, नफा–तोटा पत्रक, कॅशफ्लो बाबतचे माहितीपत्रक आणि वैधानिक लेखा परिक्षकांचा अहवाल बँकेच्या संचालक मंडळाचे वतीने आपणांसमोर सादर करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

**बँकेचे कार्यक्षेत्र व शाखा विस्तार :**

आपल्या बँकेचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र असे असून बँकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्राहकांना विविध स्वरुपाच्या बँकिंग सेवा–सुविधा प्रदान करण्याचे सातत्याने प्रयत्न करण्यात येतात. बँकेच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या २४ शाखा या कोअर बँकिंग सोल्युशन कार्यप्रणाली अंतर्गत कार्यान्वित असून समस्त खातेदारांना बँकेच्या कोणत्याही शाखेमार्फत आपल्या खात्यावर विविध स्वरुपाच्या बँकिंग सेवा सुविधा प्राप्त करून घेण्याच्या सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत.

**सभासद संख्या व भागभांडवल :**

गतवर्षी आपल्या बँकेचे ५२९८५ इतके नियमित तर १९८४ नाममात्र सभासद होते. अहवाल वर्षात ७८७ सभासद निवृत्त झाले तर १२८६ सभासद नव्याने दाखल झाले. वर्षाअखेर आपल्या बँकेचे ५३४८३ नियमित तर १८१० इतके नाममात्र सभासद आहेत. या आकडेवारीवरून बँकेच्या सभासद संख्येत दिवसेंदिवस समाधानकारकरित्या वाढ होत असून बँकेच्या कामकाजातील सभासदांचा वाढता सहभाग हे बँकेच्या विकासाचे तसेच बँकेचा भांडवली पाया मजबूत असल्याचे द्योतक म्हणावे लागेल.

आपल्या बँकेच्या अधिकृत भाग भांडवलाची मर्यादा रु. ५०.०० कोटी असून गत वर्षी बँकेचे वसूल भाग भांडवल रु. २४.३० कोटी इतके होते. अहवाल वर्षात निवृत्त झालेल्या सभासदांना रु.१.०१ कोटी भाग भांडवल परत करण्यात आले. बँकेकडे दाखल झालेल्या नविन सभासदांकडून रु.१.९४ कोटी इतके भाग भांडवल वसूल झाल्याने वर्षाअखेर आपल्या बँकेचे वसूल भाग भांडवल रु. २५.२३ कोटी इतके झालेले आहे. अहवाल वर्षाअखेर बँकेच्या भाग भांडवलात ३.८४% इतकी वाढ झालेली आहे.

**राखीव व इतर निधी:**

गतवर्षी अखेर आपल्या बँकेचे राखीव व इतर निधी रू.११४.५५ कोटी इतके होते. अहवाल वर्षात आपल्या बँकेने वैधानिक तरतुदी, भारतीय रिझर्व्ह बँकेचे निर्देश यांना अधिन राहून विविध निधीपैकी रू.४.५५ कोटी इतके निधी उत्पन्न व अन्य निधींमध्ये परावर्तीत केलेल असुन रू.१.७५ कोटी इतक्या निधींची नव्याने वाढ झालेली असुन अहवाल वर्षाअखेर एकूण निधी रू.१११.७५ कोटी इतके झालेले आहेत.

अहवाल वर्षाअखेर आपल्या बँकेचे स्वनिधी (Owned Funds) रु.१३६.९८ कोटी इतके असून नक्त संपत्ती मूल्य (Net Worth) रु.७०.७५ कोटी इतके आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्देशित केल्याप्रमाणे बँकांच्या पर्याप्त भांडवलाचे जोखमीत असलेल्या मालमत्तेशी (CRAR) प्रमाण हे १२% राखणे आवश्यक असतांना आपल्या बँकेने वर्षाअखेर हे प्रमाण १६.३०% इतके राखलेले आहे. बँकेने व्यवसायांतर्गत उद्‌भवणाऱ्या संभाव्य धोक्यांचे वेळोवेळी योग्यरित्या मूल्यांकन केलेले असून व्यवसायातील संभाव्य धोके टाळण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा निर्माण केलेली आहे.

**ठेवी:**

अहवाल वर्षातही बँकेने आपल्या जिंदगी देयतांचे (Assets Liability Management) सुयोग्य व्यवस्थापन केलेले आहे. अहवाल वर्षात ठेवींवरील व्याजदरांबाबत असलेल्या तीव्र स्वरुपाच्या स्पर्धेमुळे ठेवी संकलनावर मर्यादा प्राप्त झालेल्या आहेत. इतर बँकांत असलेल्या ठेवींवरील व्याजदरांचा साकल्याने अभ्यास करून आपल्या बँकेने ग्राहकांना मुदत ठेवींवर अधिकाधिक प्रमाणात व्याजदर प्रदान करण्याचे प्रयत्न केलेले आहेत. गतवर्षी बँकेकडे सर्व प्रकारच्या ठेवी रु. ८५१.४९ कोटी होत्या. अहवाल वर्षात ठेवींमध्ये रु. २२.१५ कोटीने वाढ होऊन त्या वर्षाअखेर रु. ८७३.६४ कोटी इतक्या झालेल्या आहेत. अहवाल वर्षात आपल्या बँकेच्या ठेवींमध्ये २.६०% ने वाढ झालेली आहे. बँकेने अलीकडच्या कालावधीत मुदत ठेवींच्या आकर्षक व्याजदराच्या विविध ठेव योजना कार्यान्वित केलेल्या आहेत. त्याचा सकारात्मक परिणाम ठेव वृध्दीवर सद्यस्थितीत झाल्याचे दिसुन येते. सर्व सभासद बंधूनी या योजनांचा लाभ घेण्याकरिता आम्ही या ठिकाणी नम्र आवाहन करीत आहोत.

**ठेवी विमा संरक्षण :**

बँकेमार्फत ठेवीदारांचे रु. ५.०० लाख रकमेपर्यंतच्या सर्व प्रकारच्या ठेवींना ठेवी विमा व पतहमी निगम (DICGC) अंतर्गत विम्याचे संरक्षण देण्यात येते. बँकेने माहे ३० सप्टेंबर २०२५ अखेरचा ठेवी विम्याचा हप्ता दि. १५/०५/२०२५ रोजी अदा केलेला आहे

**बाहेरील कर्जः**

खातेदारांचे समाशोधन व्यवहारांचे व्यवस्थापनाकरिता बँकेद्वारे शामराव विठ्ठल सहकारी बँक, ए.यु. स्मॉल फायनान्स बँक, सारस्वत सहकारी बँक व बँक ऑफ बरोडा या बँकांकडून मुदत ठेवींच्या तारणावर अनुक्रमे रू.९.५० कोटी, रू.८.०० कोटी, रू.२३.७५ कोटी व रू.०.५० कोटी रक्कमेचे अधिकर्ष कर्जे (Overdraft) मंजूर करण्यात आलेली आहेत. वेळोवेळी कर्ज खात्यांतून उचललेल्या रकमांचा संपूर्ण भरणा केलेला असल्याने वर्षाअखेरीस अधिकर्ष कर्जांचे बँकेस दायित्व नाही.

**निधी व्यवस्थापनांतर्गत वैधानिक तरतूदः**

बँकिंग अधिनियम १९४९ चे कलम १८ आणि २४ मधील तरतूदींना अधिन राहून बँकेने अहवाल वर्षात वैधानिक स्वरुपात राखावयाची रोखता (CRR) व तरलता (SLR) याबाबतची कटाक्षाने पूर्तता केलेली आहे. (Maintained as per RBI Directives)

**गुंतवणूक :**

अहवाल वर्षात निधींचे व्यवस्थापनांतर्गत उपलब्ध असलेले अतिरिक्त निधी कर्ज वाटपासाठी तसेच अधिकाधिक परतावा देणाऱ्या बँकांच्या मुदत ठेवीं, सरकारी कर्ज रोखे, कमर्शियल पेपर्स आदी स्वरूपाच्या गुंतवणुक दालनात गुंतवलेले आहेत.

अ) केंद्र सरकारचे कर्ज रोखे व राज्य कर्ज विकास रोखे यांमधील गुंतवणुक

गतवर्षी आपल्या बँकेचे तरलतेअंतर्गत केंद्र सरकारचे कर्ज रोखे व राज्य सरकारचे कर्ज विकास रोखे यांमधील गुंतवणुक रु. १९९.०८ कोटी इतकी होती. अहवाल वर्षात सदर गुंतवणुकीत रु. ३३.५५ कोटी घट झालेली असुन वर्षा अखेर रू. १६५.५३ कोटी इतकी झालेली आहे.

ब) बँकांअंतर्गत मुदत ठेवीतील गुंतवणुक

गतवर्षी आपल्या बँकेची बँकाअंतर्गत मुदत ठेवींतील गुंतवणूक रु. १०९.११ कोटी होती. अहवाल वर्षात सदर गुंतवणुकीमध्ये रु. ४०.१२ कोटीने वाढ झालेले आहे. वर्षाअखेर ती रू.१४९.२३ कोटी इतकी झालेली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक निर्देशानुसार युनिटी स्मॉल फायनान्स बँकेच्या Perptual Non-Cumulative Preference Share (PNCPS) मधील रु.२९.४८ कोटी गुंतवणुकी समोर रु. २९.४८ कोटींची दि.३१/०३/२०२४ अखेर संपूर्ण तरतूद (Provision) केलेली आहे.

**कर्जव्यवहार :**

अहवाल वर्षात कर्जावरील व्याजदरांबाबत तीव्र स्पर्धा असतांना आपल्या बँकेने सुरक्षित व किरकोळ स्वरुपाची कर्जे वितरीत करून कर्ज व्यवहारात समाधानकारकरित्या वाढ करण्याचे प्रयत्न साधलेले आहेत. अहवाल वर्षात अनुत्पादीत कर्ज वसुलीवर अधिक भर देण्याचे प्रयत्न साधलेले आहेत. गतवर्षी बँकेने वाटप केलेल्या कर्जांपैकी रु. ५७१.१५ कोटी इतके कर्जे येणे बाकी होती. त्यात रु.१५.६२ काटींने वाढ होऊन अहवाल वर्षाअखेर एकूण कर्जे येणे बाकी रु.५८६.७७ कोटी इतकी आहेत. बँकेच्या कर्जामध्ये २.७३% इतकी वाढ झालेली आहे. अहवाल वर्षाअखेर बँकेचे येणे असलेल्या कर्जाचे ठेवींशी गुणोत्तर (CD Ratio) ६७.१६% असल्याने बँकेने ठेवीदारांच्या ठेवींचे सुयोग्य व्यवस्थापन केलेले असल्याचे दिसून येते. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक निर्देशांनुसार आपल्या बँकेने अग्रगण्य घटकांस ६०.०६% तर दुर्बल घटकांस ८.८८% कर्जे वितरीत केलेली आहेत.

**कर्ज थकबाकी व अनुत्पादित कर्जे व्यवस्थापन :**

अहवाल वर्षाअखेर बँकेला येणे असलेल्या कर्जापैकी ५% कर्जे थकीत आहेत. तर एकूण कर्ज रक्कमेपैकी रु. ३१.०३ कोटी कर्जे ढोबळ अनुत्पादित कर्जे (Gross NPAs) म्हणून वर्गीकृत करण्यात आलेली आहेत व त्याचे एकूण कर्जाचे प्रमाण ५.२९% इतके आहे. आपल्या बँकेने उत्पादित तसेच अनुत्पादित कर्जांसाठी अतिरिक्त स्वरुपात तरतूदी केलेल्या असल्याने बँकेची निव्वळ अनुत्पादित कर्जे (Net NPAs) ०.०% इतकी आहेत. अहवाल वर्षात बँकेचे संचालक मंडळ सदस्य, अधिकारी व कर्मचारी वर्गाने कर्ज थकबाकी वसुलीस सर्वोच्च प्राधान्य देत अनुत्पादित कर्ज वाढीवर समाधानकारकरित्या नियंत्रण राखलेले आहे. कर्जदारांना आपल्या कर्जाचे हप्ते नियमित भरणेबाबत विनंती करण्यात येत आहे.

**संशयित व बुडीत कर्जाचे निर्लेखन :**

बँकेच्या एकूण १४ जुन्या अनुत्पादित कर्ज खात्यांवरील येणे रक्कमेपोटी कर्ज वसूलीबाबत बँकेच्या वसूली विभागाद्वारे सर्वतोपरी प्रयत्न करून तसेच कायदेशीर कारवाई करूनही कर्ज वसूल होऊ शकलेली नाहीत. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक निर्देशांनुसार अशा अनुत्पादित कर्जाच्या येणे रक्कमांपोटी १००% तरतूद करण्यात आलेली असून सदर थकीत कर्ज वसुल करण्यासाठी होणारे वसूली खर्च, अन्य प्रशासकीय खर्च यांमध्ये बचत करणे, बँकेचा ताळेबंद स्वच्छ करून तो सत्यस्थितीदर्शक करणे, आर्थिक गुणोत्तरे सुधारणा तसेच करपात्र उत्पन्नानुसार कर बचतीचा लाभ घेणे आदी बाबींकरिता बँकेच्या संचालक मंडळाने

शिफारस केल्याप्रमाणे व वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणीत केल्यानुसार अशा अनुत्पादित कर्ज खात्यांवरील येणे शिल्लक रक्कम रु. २३,३२,५१६.७६ व त्यावरील येणे व्याज रु. ८,०९,५२२.७९ अशी एकूण रु. ३१,४२,०३९.५५ रक्कम सदर कर्जदार यांचेकडून वसुलीबाबतचे सर्व अधिकार अबाधित राखून निर्लेखित करण्याबाबत निर्णयाचे अधिकार बँकेच्या संचालक मंडळास प्रदान करण्याकरिता व मा. वार्षिक सभेने मान्यता देण्याकरिता विनंती करण्यात येत आहे. सदर कर्जे निर्लेखिकरण प्रक्रियेचे स्वरुप हे कर्ज माफ स्वरुपाचे नसून सदर अनुत्पादित कर्जांची पूर्णतः वसूली झाल्याशिवाय कर्जदारांना कर्ज बंद झाल्याचे प्रमाणपत्र (No Dues Certificate) दिले जाणार नसल्याने सदर प्रक्रिया ही केवळ लेखी नोंदीच्या (Accounting Standard) पद्धतीस अधिन राहून करण्यात येत आहे.

**खेळते भांडवल :**

गतवर्षी आपल्या बँकेचे खेळते भांडवल रु. १०३४.४८ कोटी इतके होते. अहवाल वर्षात त्यात रु. ४१.०९ कोटीने वाढ होऊन वर्षाअखेर ते रु.१०७५.५७ कोटी झालेले आहे. आगामी कालावधीत बँकेच्या व्यवसाय वाढीकरिता सर्वोतपरी प्रयत्न करून खेळत्या भांडवलामध्ये समाधानकारक वाढ केली जाणार आहे.

**संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांची कर्जे :**

संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना बँकेमार्फत मंजूर करावयाच्या कर्जावर भारतीय रिझर्व्ह बँकेचे निर्बंध असल्यामुळे अहवाल वर्षात अशी कर्जे वितरीत करण्यात आलेली नाहीत. तथापि, वैधानिक स्वरुपात सादर कराव्या लागणाऱ्या माहितीपत्रात संचालक मंडळात नव्याने निवडून आलेल्या सदस्यांनी व त्यांचे नातेवाईकांनी बँकेकडून संचालक मंडळाचे निवडणूकीपूर्वी घेतलेली कर्जे संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांची कर्जे वर्षा अखेर येणे म्हणून दाखविणे अभिप्रेत असते. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांच्या दि. ३१/०३/२०२५ अखेर येणे असलेल्या कर्जाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांच्या ३१ मार्च २०२५ अखेरच्या कर्जाची माहिती** (रु. लाखांत)

| संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक की ज्यांनी बँकेकडून कर्ज घेतलेले आहे त्यांची संख्या | वर्षाच्या सुरूवातीला वाटप केलेल्या कर्जापैकी येणे असलेल्या कर्जाची रक्कम (दि.०१.०४.२०२४) | दि.०१.०४.२०२४ ते दि.३१.०३.२०२५ या कालावधीत वाटप झालेली रक्कम | दि.०१.०४.२०२४ ते दि.३१.०३.२०२५ या कालावधीत वसुल झालेली रक्कम | वर्षाअखेर असलेल्या येणे कर्जाची रक्कम (दि.३१.०३.२०२५) | येणे कर्जापैकी थकबाकी असलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| अ) संचालक – ० | ० | ० | ० | ० | ---- | ---- |
| ब) संचालकांचे नातेवाईक – ३ | ३२.९९ | ० | ३२.९९ | ० | ---- | ---- |
| एकुण रूपये | **३२.९९** | **०** | **३२.९९** | **०** | ---- | ---- |

**संचालक मंडळ व समित्या सभाः**

बँकेच्या संचालक मंडळात आर्थिक, सामाजिक, कामगार व औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असलेले सदस्य असून त्यांच्यात असलेला व्यवसायिक दृष्टीकोन व दुरदर्शीपणा बँकेच्या सर्वांगीण विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावत असतो. अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १४ सभा घेण्यात आल्या. या सर्व सभांना संचालकांची उपस्थिती समाधानकारक राहिलेली आहे. बँकेचे सर्व संचालक सदस्य सभासद, ग्राहक व कर्मचारी वर्गास सदैव मार्गदर्शन करतात व बँकेच्या कामकाजात सहभागी होऊन कामकाजात गतिमानता राखण्याचे प्रयत्न करतात. बँकेतील विविध विभागांचे कामकाज जलदगतीने व सुलभतेने होण्यासाठी संचालक मंडळांतर्गत असलेली कर्ज मंजुरी समिती, कार्यकारी समिती, ऑडीट समिती, वसुली समिती, गुंतवणूक समिती, संगणक समिती, एकरकमी तडजोडीने कर्ज वसुली समिती यांच्या वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या सभांनाही समिती सदस्यांची उपस्थिती समाधानकारक राहिलेली आहे.

**संचालक मंडळ व उपसमित्या सभांमधील संचालक सदस्यांची २०२४-२५ उपस्थिती**

| अ.क्र. | संचालकांचे नाव | एकूण सभा | संचालक सभा | उपसमित्या सभा | उपस्थिती | उपस्थितीचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री विक्रम विजयकुमार भिलारे | १५ | १४ | १ | १५ | १००.००% |
| २ | श्री चंद्रकांत तानाजी दळवी | २९ | १४ | १५ | २९ | १००.००% |
| ३ | श्री चंद्रकांत रावसाहेब गावडे | ४९ | १४ | ३५ | ४५ | ९१.८४% |
| ४ | श्री प्रकाश जगन्नाथ मस्कर | ३९ | १४ | २५ | ३९ | १००.००% |
| ५ | श्री योगेशराव हरिभाऊ गोळे | ४४ | १४ | ३० | ४४ | १००.००% |
| ६ | श्री अरूण बाबुराव सुर्वे | ३७ | १४ | २३ | ३६ | ९७.३०% |
| ७ | श्री संतोष रामचंद्र कळंबे | २६ | १४ | १२ | २६ | १००.००% |
| ८ | श्री बाळासाहेब तुकाराम भालेघरे | ३३ | १४ | १९ | ३३ | १००.००% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | श्री अजित काशीनाथ कळंबे | १८ | १४ | ४ | १८ | १००.००% |
| १० | श्री विश्वनाथ ज्ञानदेव धनावडे | ४१ | १४ | २७ | ४१ | १००.००% |
| ११ | श्री रामचंद्र विठ्ठल चिकणे | २१ | १४ | ७ | २१ | १००.००% |
| १२ | श्री गणेश नामदेव भोसले | २३ | १४ | ९ | २१ | ९१.३०% |
| १३ | श्री विजय दगडु कदम | ३५ | १४ | २१ | ३५ | १००.००% |
| १४ | श्री चंद्रकांत नामदेव गवळी | २६ | १४ | १२ | २४ | ९२.३१% |
| १५ | सौ जयश्री वसंतराव मानकुमरे | १४ | १४ | ० | १४ | १००.००% |
| १६ | सौ उमिता शिवाजी रांजणे | २६ | १४ | १२ | २५ | ९६.१५% |
| १७ | श्री चंद्रकांत सुदाम पवार | २० | १४ | ६ | २० | १००.००% |
| १८ | श्री वसंत जिजाबा तरडे | ३० | १४ | १६ | ३० | १००.००% |
| १९ | श्री प्रविण वसंत शिंदे | २३ | १४ | ९ | २१ | ९१.३०% |
| २० | श्री अशोक रामचंद्र चव्हाण | २३ | १४ | ९ | २३ | १००.००% |

**बँक व्यवस्थापन मंडळ** (Board of Management):

